असा. क्र. ४४. रजिस्टर्ड नं. एमएच/एमआर/साऊथ-२२९/२००६-०८.

# महाराष्ट्र शासन राजपत्र

**असाधारण**

**प्राधिकृत प्रकाशन**

**सोमवार, डिसेंबर २९, २००८/पौष ८, शके १९३०**

**स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.**

## भाग चार

**दिनांक २९ डिसेंबर २००८ रोजी माननीय राज्यपालांनी संमती दिलेला महाराष्ट्र विधानमंडळाचा पुढील अधिनियम माहितीसाठी, याद्वारे, प्रसिद्ध करण्यात येत आहे.**

**ह. बा. पटेल,**
सचिव,
महाराष्ट्र शासन,
विधी व न्याय विभाग.

### सन २००८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३१.

(माननीय राज्यपालांची संमती मिळाल्यानंतर "महाराष्ट्र शासन राजपत्रात" दिनांक २९ डिसेंबर २००८ रोजी प्रथम प्रसिद्ध केलेला अधिनियम.).

**महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास अधिनियम, १९७६ यात आणखी सुधारणा करण्याकरिता अधिनियम.**

**ज्याअर्थी,** राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नव्हते ;

**आणि ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांसाठी, महाराष्ट्राच्या राज्यपालांनी, महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास अधिनियम, १९७६, यात आणखी सुधारणा करण्यासाठी तात्काळ कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली होती; आणि, म्हणून, त्यांनी दिनांक २९ ऑगस्ट २००८ रोजी महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास (सुधारणा) अध्यादेश, २००८ प्रख्यापित केला होता ;

१९७७ चा महा. २८.

२००८ चा महा. अध्या. ६.



[**किंमत** : रुपये १५.००]

**आणि ज्याअर्थी,** उक्त अध्यादेशाचे राज्य विधानमंडळाच्या अधिनियमात रूपांतर करणे इष्ट आहे ; त्याअर्थी, भारतीय गणराज्याच्या एकोणसाठाव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

संक्षिप्त नाव व प्रारंभ.

**१.** (१) या अधिनियमास, महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास (सुधारणा) अधिनियम, २००८ असे म्हणावे.

(२) तो, दिनांक २९ ऑगस्ट २००८ रोजी अंमलात आला असल्याचे मानण्यात येईल.

सन १९७७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २८ याच्या कलम ८८ ची सुधारणा.

**२.** महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास अधिनियम, १९७६ (यात यापुढे ज्याचा निर्देश " मुख्य अधिनियम " असा करण्यात आला आहे) याच्या कलम ८८ मधील, पोट-कलम (३) मध्ये,— १९७७ चा महा. २८.

(क) खंड (अ) मध्ये, " एखाद्या इमारतीच्या संरचनात्मक दुरुस्तीचा खर्च दर चौरस मीटरला एक हजार दोनशे रुपयांपेक्षा जास्त होईल " या मजकुराऐवजी, " एखाद्या इमारतीच्या संरचनात्मक दुरुस्तीचा दर चौरस मीटरचा खर्च हा, राज्य शासन **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, दर चौरस मीटरच्या संरचनात्मक दुरुस्तीच्या खर्चाची रक्कम म्हणून विनिर्दिष्ट करील अशा रकमेपेक्षा अधिक होईल " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(ख) खंड (ब) मध्ये,—

(एक) " दर चौरस मीटरला एक हजार दोनशे रुपयांपेक्षा जास्त होईल, " या मजकुराऐवजी, " दर चौरस मीटरला खंड (अ) अन्वये विनिर्दिष्ट केलेल्या रकमेपेक्षा अधिक होईल, " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(दोन) " दर चौरस मीटरला एक हजार दोनशे रुपयांपेक्षा अधिक होत नाही, " या मजकुराऐवजी, " दर चौरस मीटरला खंड (अ) अन्वये विनिर्दिष्ट केलेल्या रकमेपेक्षा अधिक होत नाही, " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(ग) दुसऱ्या परंतुकामध्ये, " दर चौरस मीटरला एक हजार दोनशे रुपयांपेक्षा अधिक असणारा " या मजकुराऐवजी, " दर चौरस मीटरला खंड (अ) अन्वये विनिर्दिष्ट केलेल्या रकमेपेक्षा अधिक असणारा " हा मजकूर दाखल करण्यात येईल.

२००८ चा महा. अध्या. ६.

**३.** (१) महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास (सुधारणा) अध्यादेश, २००८ हा, याद्वारे, निरसित करण्यात येत आहे.

सन २००८ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ६ याचे निरसन व व्यावृत्ती.

(२) अशा प्रकारे निरसन झाले असले तरी, उक्त अध्यादेशाद्वारे सुधारणा करण्यात आलेल्या मुख्य अधिनियमान्वये करण्यात आलेली कोणतीही कृती किंवा कार्यवाही (काढण्यात आलेली कोणतीही अधिसूचना यांसह) ही, या अधिनियमाद्वारे सुधारणा करण्यात आलेल्या मुख्य अधिनियमाच्या संबंधित तरतुदींअन्वये यथास्थिति, करण्यात आलेली कोणतीही कृती किंवा कार्यवाही असल्याचे मानण्यात येईल.

---

शासकीय मुद्रणालय, नागपूर

असा. क्र. ८३. रजिस्टर्ड नं. एमएच/एमआर/साऊथ-२२९/२००६-०८.

# महाराष्ट्र शासन राजपत्र

असाधारण

प्राधिकृत प्रकाशन

सोमवार, डिसेंबर २९, २००८/पौष ८, शके १९३०

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.

## भाग आठ

**(अध्यादेश, विधेयके व अधिनियम यांचा इंग्रजी अनुवाद)**

In pursuance of clause *(3)* of Article 348 of the Constitution of India, the following translation in English of the Maharashtra Housing and Area Development (Amendment) Act, 2008 (Mah. XXXI of 2008), is hereby published under the authority of the Governor.

By order and in the name of the
Governor of Maharashtra,

H. B. PATEL,
Secretary to Government,
Law and Judiciary Department.

## MAHARASHTRA ACT No. XXXI OF 2008.

(First published, after having received the assent of the Governor, in the "Maharashtra Government Gazette" on the 29th December, 2008.)

An Act further to amend the Maharashtra Housing and Area Development Act, 1976.

WHEREAS both Houses of the State Legislature were not in session ;

Mah. XXVIII of 1977. AND WHEREAS the Governor of Maharashtra was satisfied that circumstances existed which rendered it necessary for him to take immediate action further to amend the Maharashtra Housing and Area Development Act, 1976, for the purposes hereinafter appearing ; and, therefore, promulgated the Maharashtra Housing and Area Development (Amendment) Ordinance, 2008, on the 29th August 2008 ; Mah. Ord. VI of 2008.

AND WHEREAS it is expedient to replace the said Ordinance by an Act of the State Legislature; it is hereby enacted in the Fifty-ninth Year of the Republic of India as follows :—

Short title and commencement.

**1.** (*1*) This Act may be called the Maharashtra Housing and Area Development (Amendment) Act, 2008.

(*2*) It shall be deemed to have come into force on the 29th August 2008.

Amendment of section 88 of Mah. XXVIII of 1977.

**2.** In section 88 of the Maharashtra Housing and Area Development Act, 1976 (hereinafter referred to as "the principal Act"), in sub-section (*3*),— Mah. XXVIII of 1977.

(*a*) in clause (*a*), for the words "a building will exceed one thousand and two hundred rupees per square metre" the words "a building, per square metre, will exceed such amount, as may be specified by the State Government, by notification in the *Official Gazette,* to be the structural repairs cost per square metre" shall be substituted;

(*b*) in clause (*b*),—

(*i*) for the words "a building will exceed one thousand and two hundred rupees per square metre" the words "a building, per square metre, will exceed the amount specified under clause (*a*)" shall be substituted;

(*ii*) for the words "such building does not exceed one thousand and two hundred rupees per square metre" the words "such building, per square metre, does not exceed the amount specified under clause (*a*)" shall be substituted;

(*c*) in the second proviso, for the words "one thousand and two hundred rupees per square metre" the words "the amount specified under clause (*a*)" shall be substituted.

Repeal of Mah. Ord. VI of 2008 and saving.

**3.** (*1*) The Maharashtra Housing and Area Development (Amendment) Ordinance, 2008, is hereby repealed. Mah. Ord. VI of 2008.

(*2*) Notwithstanding such repeal, anything done or any action taken (including any notification issued) under the principal Act, as amended by the said Ordinance, shall be deemed to have been done, taken or issued, as the case may be, under the corresponding provisions of the principal Act, as amended by this Act.